# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 02/11/2019 (शनिवार)
# (दुपार)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 20 कि.मी अंतरावर बेसुर शिवार येथे दिनांक 01/11/2019 चे 02:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल श्रीराम कुर्वे, वय 50 वर्ष, रा. बेसुर ता. भिवापुर, जि. नागपूर हे दिवाळी सणा निमित्य बाहेरगावी गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींच्या घराचे दाराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील कपाटात लॉकर मध्ये ठेवलेल नगदी 38,000/–रू., सोन्या–चांदीचे दागिने कि. 21,840/–रू. व मेकअप किट कि. 12,000/–रू. तसेच फिर्यादींच्या घराशेजारी राहणारे रमेश रामवचंद्र थोटे यांचे कापातात ठेवलेले नगदी 2,000/–रू. असा एकुण कि. 73,840/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मारेती राऊत हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 09 कि.मी अंतरावर टाकळी भंसाळी येथे दिनांक 01/11/2019 चे 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश सुरेश चौधरी, वय 39 वर्ष, रा. टाकळी भंसाळी यांनी भाऊ आरोपी नामे– निलेश सुरेश चौधरी, रा. टाकळी भंसाळी, ता. सावनेर याने फिर्यादीला पैसे मागितले असता पैसे न दिल्याचे कारणाने त्याच्या वाद झाला. यानंतर आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने तोंडावर मारले त्यामुळे तोंडाचे भारावर दरवाज्यावर जाऊन आपटल्याने फिर्यादीचे समोरील दात पडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 325 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कृष्णा जुनघरे हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील मनसर रामधाम समोर येथे दिनांक 26/10/2019 चे 18:00 वा. दरम्यान महेन्द्र हिरामन बोरकर, वय 53 वर्ष हे त्यांच्या एमएच–40/एए–4488 क्रमांकाच्या मोटरसायकलने रामधाम मनसर येथे जात होते. दरम्यान मागून येणाऱ्या एमपी– 20/पीए– 8001 क्रमांकाच्या ट्रॉव्हल्सचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक महेन्द्र बोरकर हे जखमी झाल्याने उपचाराकामी त्यांना नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार अनिल बुराडे, पो. स्टे. जुनी कामठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर